GR-200404061141020001-0100

<u>चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत</u>

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक :- आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२-८५/तेरा,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- १५ एप्रिल, १९९१

वाचा :- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीआर-११७४/२०३२/बारा, दिनांक २३ सप्टेंबर, १९७५

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीआर-११७४/२०३२/ १३९०/ बारा, दिनांक ७ जुलै, १९७६

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८९/ प्र.क्र.२४/८९/१२, दिनांक २६ नोव्हेंबर, १९९०

(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८९/ प्र.क्र.२४-अ/ ८९/१२, दिनांक २६ नोव्हेंबर, १९९०

## शासन निर्णय

उपरोक्त दिनांक २३ सप्टेंबर, १९७५ आणि दिनांक ७ जुलै, १९७६ च्या शासन निर्णयानुसार एस.एस.सी. अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व चतुर्थश्रेणीमध्ये तीन वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यास तृतीय श्रेणीतील फक्त लिपिक पदावर त्या त्या विभागात / कार्यालयात त्या त्या विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या पदांच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. पदोन्नतीची ही संधी लिपिक पदाव्यतिरिक्त लिपिक-टंकलेखक / टंकलेखक या पदांसाठीही उपलब्ध करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबतीत सचिव समितीच्या दिनांक २४ डिसेंबर, १९८७ रोजी झालेल्या बैठकीतील शिफारशी लक्षात घेऊन आणि उपरोक्त दिनांक २६ नोव्हेंबर, १९९० च्या शासन निर्णयातील आदेशानुसार लिपिक, लिपिक-टंकलेखक आणि टंकलेखक या संवर्गाचे एकत्रिकरण करुन लिपिक-नि-टंकलेखक असा एकच संवर्ग निर्माण करण्यात आला आहे हेही विचारात घेऊन चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचाऱ्यांना तृतीय श्रेणीतील लिपिक-नि-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याबाबत आता पुढीलप्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

(१) एस.एस.सी.अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि चतुर्थश्रेणीत तीन वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याला तृतीयश्रेणीतील त्या विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या लिपिक-नि-टंकलेखक पदांच्या २५% पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

(२) चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचाऱ्यांना त्यांनी टंकलेखनातील आवश्यक गती (प्र.मि. ४० शब्द इंग्रजी आणि ३० शब्द मराठी) असल्याचे नियमानुसार विहित केलेले प्रमाणपत्र (गव्हर्नमेंट कमर्शियल सर्टिफिकेट) सादर करण्याच्या अटीवर तृतीय श्रेणीतील लिपिक-नि-टंकलेखक या पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

(३) चतुर्थश्रेणीत प्रवेश करताना एस.एस.सी.किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ज्या दिवशी त्यांची तीन वर्षे सलग सेवा पूर्ण होईल तो दिनांक जेष्ठतेचा दिनांक समजण्यात यावा व चतुर्थश्रेणीत नियुक्ती झाल्यानंतर एस.एस.सी.किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची तीन वर्षे सलग सेवा झाली असल्यास एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक जेष्ठतेचा दिनांक समजण्यात यावा.

(४) प्रत्येक विभागाने प्रत्येक जिल्ह्यातील आपापल्या कार्यालयांसाठी (जिल्हा स्तरावर) स्वतंत्र अशी सामायिक जेष्ठता यादी तयार करुन त्या त्या जिल्ह्यातील आपल्या विभागाची सर्व कार्यालये मिळून त्या विशिष्ट वर्षी उपलबध होणाऱ्या रिक्त पदांपैकी २५% पदे चतुर्थश्रेणीतील पात्र व्यक्तींच्या जेष्ठता यादीतून भरावीत.

(५) चतुर्थश्रेणीतील पात्र कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी ठेवण्यासाठी प्रत्येक विभागाने त्या त्या जिल्ह्यातील आपापल्या कार्यालयांमधून एखाद्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

(६) मंत्रालयीन विभागांच्या बाबतीत मात्र सध्याप्रमाणेच प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र यादी तयार करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

भा.म.भणगे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधानसभा / विधानपरिषद), मुंबई (पत्राने),
महालेखापाल -१, व २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर
महालेखापाल -१, व २, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई, / नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई, / निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शुध्दीपत्रक क्रमांक :- आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२-८५/तेरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ११ जून, १९९१

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीआर-१०८५/८५३/ प्र.क्र. ७२-८५/तेरा, दिनांक १५ एप्रिल, १९९१

**शुध्दीपत्रक :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र. ७२-८५/तेरा, दिनांक १५ एप्रिल, १९९१ मधील क्रमांक २ मध्ये कंसात नमूद केलेल्या "(प्र.मि.४० शब्द इंग्रजी आणि ३० शब्द मराठी)" या शब्दाऐवजी "(प्र.मि.४० शब्द इंग्रजी किंवा ३० शब्द मराठी)" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भा.म.भणगे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधानसभा / विधानपरिषद), मुंबई (पत्राने),
महालेखापाल -१, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल -२, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,